**परिपत्रक**

जा. क्र. एबाविसेयो/का-४/ ९२९४ /२०१४
आयुक्तालय, एकात्मिक बाल विकास सेवा योजना,
रायगड भवन, (रिअर विंग), पहिला मजला,
सीबीडी, बेलापूर, नवी मुंबई- ४०० ६१४
दिनांक :- 3/11/2014

प्रति,

१) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बाक)
जिल्हा परिषद-----------------(सर्व)
२) बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी)------------------(सर्व)
३) बाल विकास प्रकल्प अधिकारी(ग्रामीण / आदिवासी )-----------------(सर्व)
४) मुख्यसेविका (सर्व)
५) अंगणवाडी सेविका / मदतनीस /मिनी अंगणवाडी सेविका (सर्व)

विषय :- **"बाल स्वच्छता अभियान"** राबविणेबाबत.
संदर्भ :- केंद्र शासनाचे पत्र No.१९-३/२००४-CD.I(Vol,V) part file दि. ३०/१०/२०१४

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये केंद्र शासनाकडून **"बाल स्वच्छता अभियान"** राबवावयाचे ठरविण्यात आलेले आहे. या अंतर्गत सर्व बाल विकास प्रकल्पाचे अधिकारी, कर्मचारी, अंगणवाडी सेविका, मदतनीस, पालक, महिला बचत गट, महिला मंडळ, माता समिती सदस्य, ग्राम पंचायत व पंचायत समिती सदस्य, शाळेचे शिक्षक, आरोग्य अधिकारी तसेच अंगणवाडी स्तरीय संनियंत्रण व पाठपुरावा समितीचे सदस्य या सर्वांचा सक्रिय सहभाग असेल.

या अभियांनातर्गत ग्रामीण व शहरी भागातील आरोग्य व स्वच्छता यामध्ये सुधारणा होण्याच्या दृष्टीने यामध्ये बालकांची अतिशय महत्वपूर्ण भूमिका असून ते स्वत: यासाठी प्रोत्साहित होऊन घर, शाळा व परिसर स्वच्छतेसाठी त्याचा महत्वाचा सहभाग राहिल.

अशा प्रकारची स्वच्छता मोहीम दिनांक १४ ते १९ नोव्हेंबर या कालावधीत **"आयसीडीएस सप्ताह"** म्हणून साजरा करावयाचा आहे. या सप्ताहामध्ये अंगणवाडी केंद्र व परिसरात खालील प्रमाणे दैनंदिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | दि. १४ नोव्हेंबर | :- | बालमेळा तथा स्वच्छता व आरोग्य या विषयाची घोषवाक्य असलेली फलके घेऊन प्रभातफेरी काढावी. |
| २. | दि. १५ नोव्हेंबर | :- | माता बैठक (आरोग्य व गावातील विशेषत: घरातील स्वच्छता या विषयावर चर्चा) |
| ३. | दि. १६ व १७ नोव्हेंबर | :- | स्वत:चे आरोग्य व स्वच्छता या विषयावर आरोग्य कर्मचारी (उदा. ए.एन.एम, आशा इ. ) यांचे समन्वयाने विविध स्तरावर चर्चासत्र आयोजित करणे (अंगणवाडी, प्रकल्प, जिल्हास्तर) |
| ४. | दि. १८ नोव्हेंबर | :- | अंगणवाडी स्तरावर आहार, आरोग्य व स्वच्छता, Nutrition या विषयावर महिला बचत गट, किशोरी मुली यांची बैठक घेऊन चर्चा घडवून आणणे. / Demonstration of पाककला तसेच ग्रामीण आरोग्य व पोषण दिवस साजरा करण्यात यावा. यादिवशी पाककृती प्रात्यक्षिक आयोजित करुन विविध पाककृती मातांसमोर त्यांचे सहभागातून कराव्यात. विविध प्रकारच्या साहित्याचे प्रदर्शन ठेवण्यात यावे. |

| | | |
|---|---|---|
| ५. दि. १९ नोव्हेंबर | :- | बालकांची स्पर्धा, (विषय :- स्वच्छता बालमेळा, स्वच्छ पिण्याचे पाणी, स्वच्छ अन्न इ. )<br>ग्राम शिक्षण /स्वच्छता समिती सोबत त्यांना सहभागी करुन जागतिक प्रसाधन दिवस साजरा करणे. |

दिनांक १९ नोव्हेंबर रोजी **"जागतिक प्रसाधने (शौचालय)"** दिवस म्हणून साजरा करावयाचा आहे. या दिवशी एका क्षेत्रातील (भागातील) विशेषत: नागरी क्षेत्रातील अंगणवाडी सेविकांनी जागतिक प्रसाधने (Toilets) ची स्वच्छता राखण्याचे महत्व, त्यांचे होणारे वाईट व चांगले परिणाम, अस्वच्छतेमुळे होणारे आजार, उदा- मलेरिया, कॉलरा, कावीळ, त्वचेचे रोग, व इतर संसर्ग या विषयावर चर्चासत्र आयोजित करावे, यामध्ये स्थानिक पालक, शाळेचे कर्मचारी, मुले, आरोग्य कर्मचारी यांचा सहभाग घेण्यात यावा. यासाठी मुख्यसेविकांनी त्यांचे बीटमधील अशा केंद्राचे गट तयार करुन त्या बीटमध्ये विविध ठिकाणी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे.

प्रभात फेरीमध्ये गावातील किशोरी मुली, प्राथमिक शाळेची मुले, यांचाही समावेश असावा. याबाबत प्राथमिक शाळेचे शिक्षकांशी अंगणवाडी सेविका / मुख्यसेविका यांनी संपर्क साधावा.

अंगणवाडी केंद्रासमोर आरोग्य व स्वच्छता याबाबतचे घोषवाक्य व संदेश चित्र असलेले पोस्टर्स लावावेत. अंगणवाडीत मुलांना सांगण्यात येणारे स्वच्छतेचे नियम याचाही मोठया प्रमाणावर प्रचार व प्रसार करावा.

याद्वारे आपणास कळविण्यात येते की, अंगणवाडी केंद्र, बालकांचे घर व परिसर येथे स्वच्छता राखण्यासाठी लहान मुलांची भुमिका महत्वाची असून यातूनच त्यांना संस्कार मिळतात. त्यामुळे या मुलांना या मोहिमेत प्रामुख्याने समाविष्ट करण्यात यावे. ही मोहिम केवळ या सप्ताहापूरती न राबविता नियमितपणे राबविण्यात यावी. तसेच प्रत्येक चर्चासत्र व बैठक या विषयावर चर्चा घडवून आणावी.

आपल्यातर्फे राबविण्यात आलेल्या कार्यक्रमांचे फोटोग्राफस् व एकत्रित जिल्हयाचा/नागरी प्रकल्पांचा अहवाल तयार करुन आयुक्तालयास पाठविण्यात यावा. तसेच आपल्या जिल्हयाच्या वेबसाईटवर ठेवण्यात यावा.

(स्वाक्षरी) ७/११/२०१४.

आयुक्त
एकात्मिक बाल विकास सेवा योजना,
महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई

प्रत,

१) मा. प्रधान सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सादर
२) जिल्हाधिकारी, जिल्हा----------------(सर्व) यांना माहितीस्तव तथा पुढील कार्यवाहीसाठी सादर
३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद ----------------(सर्व) यांना माहितीस्तव तथा पुढील कार्यवाहीसाठी सादर
४) विभागीय उप आयुक्त (कोकण, नाशिक,पुणे, औरंगाबाद, अमरावती, नागपूर विभाग), महिला व बाल विकास यांना पुढील कार्यवाहीसाठी रवाना. यांना कळविण्यात येते की, आपले अधिनस्त असलेले जिल्हे /नागरी प्रकल्प/ग्रामीण प्रकल्प/आदिवासी प्रकल्प यांना वरील सुचनांप्रमाणे कार्यवाही करणेसाठी कळविण्यात यावे. तसेच **"बाल स्वच्छता अभियान"**, **"आयसीडीएस सप्ताह"** व **"जागतिक प्रसाधने (शै ाचालय) दिवस"** यशस्वीरित्या राबविण्याची कार्यवाही करण्यात यावी.